# प्र क र ण चौ थे

## सर्वेक्षणातील शेतक-यांची प्राथमिक माहिती

---

प्र. १ वय

प्र. २ जात

प्र. ३ शिक्षण

प्र. ४ व्यवसाय

प्र. ५ शेतकरी म्हणून अनुभव काळ

प्र. ६ कुटुंब आकार

प्र. ७ वार्षिक उत्पन्न

प्र. ८ धारणाक्षेत्र

प्र. ९ पीक प्रकार

प्र. १० जमीन खरेदी व विक्री व्यवहार

प्र. ११ कर्ज पुरवठ्याचे मार्ग

प्र. १२ बाजार आवार स्थापनेच्या मागील उद्देश

---

# प्रकरण चौथे

## सर्वेक्षणातील शेतकऱ्यांची प्राथमिक माहिती

कोणत्याही प्रदेशाचा आर्थिक विकास साधायचा असतानर ज्यांच्या करिता व ज्यांच्या व्दारे तो साधायचा आहे त्याचे पुरेपूर सहकार्य त्याकरिता प्राप्त होणे आवश्यक असते. कृषि विकास पूर्णपणे ग्रामीण लोकांच्या सहकार्यावर व त्यांच्या कृषिसंबंधी विकासाबाबत असणाऱ्या आस्थेवर अवलंबून असतो. ग्रामीण भागातील सहकार्याचा, ग्रामीण लोकांच्या शिक्षणाचा त्यांना असलेल्या कृषिसंबंधी ज्ञानाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या संबंध कृषि विकासाशी असतो. कृषि विकास म्हणजे जमिनीच्या विकासाबरोबरच त्याच्या संबंधित माणूस, प्राणी, पशुधन व शेतीला आवश्यक त्या सर्व वस्तूंचा विकास होय. विकास मानसिक विचाराचे प्रतिक आहे. जनतेला, लोकांना आपल्या भौतिक परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यापूर्वी त्यांना स्वतःला विकसित करावे लागते. हा विकास ग्रामीण स्थितीशी, लोकांच्या राहणीमानाशी, तेथील सामाजिक स्थितीशी, चालीरीतीशी, लोकांच्या धार्मिक व्यवहाराशी अत्यंत निगडीत आहे.

ज्याप्रमाणे प्रदेशाचा कृषि विकास हा विविध बाबींशी निगडीत असतो. त्याचप्रमाणे एखाद्या तालुक्याचाही कृषि विकास हा उपरोक्त बाबींशी निगडीत असतो. कृषि विकासाचे महत्वपूर्ण अंग "कृषि बाजार" आहे. जेव्हा शेतकरी शेतीकडे फक्त उदरनिर्वाहाचे साधन म्हणून न पाहता व्यापारी दृष्टीकोनातून बाजार अधिक्य उत्पादन करेल तेंव्हाच कृषि विकासास हातभार लागेल.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास गावातील सामाजिक व आर्थिक स्थितीचा मागोवा घेण्यात आला आहे. पंढरपूर तालुक्यातील तुंगत, रोपळे, गादेगांव, सिध्देवाडी, करकंब, सरकोली, भाळवणी, भंडीशेगांव या अभ्यास गावातील प्रत्येकी दहा शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीवरुन शेतकऱ्यांची साधारण स्थिती

प्राथमिक स्वरूपामध्ये अभ्यासली आहे. यामध्ये शेतक-यांचे वय, जात, शिक्षण व्यवसाय, शेतकरी म्हणून अनुभव-काळ, कुटुंब आकार, वार्षिक उत्पन्न, धारण क्षेत्र, पीक प्रकार, जमिनीचे व्यवहार, कर्ज पुरवण्याचे मार्ग व कृषि उत्पन्न बाजारपेठ स्थापन्यामागील हेतु या बाबींचा अभ्यास सदर प्रकरणात करण्यात येत आहे.

४.१ <u>वय</u> :

अभ्यासातील शेतकरी हा कुटुंब प्रमुख आहे. त्यामुळे त्याची शारिरीक कार्यक्षमता पाहण्यासाठी वयाचा विचार करणे आवश्यक आहे. एकूण शेतक-यांपैकी ७३.७५ टक्के शेतकरी हे २६ ते ५५ या वयोगटातील आहेत. ३६ ते ४५ या वयोगटापर्यंत शेतकरी संख्या वाढत जाऊन सर्वात जास्त झाली आहे. या वयोगटानंतर वयाच्या उतरणीबरोबर शेतकरी संख्येत घट झालेली आहे.

४.२ <u>जात</u> :

अभ्यास गावात हिंदु, मुस्लिम व जैन धर्माचे लोक आढळले. पैकी हिंदुधर्मीय शेतक-यांची संख्या सर्वात जास्त [९३.७५ टक्के] आहे. तर मुस्लिम धर्मीय शेतकरी [३.७५ टक्के] व जैन-कासार धर्मीय शेतकरी [२.५टक्के] यांचे प्रमाण अल्प दिसले.

हिंदुधर्मीयांमधील ग्रामीण भागातील बलुतेदारपध्दतीतील जाती आणि इतर जातीतील [मराठा, ब्राम्हण, माळी, न्हावी, चांभार, महार, कुंभार, कोळी लिंगायत] शेतक-यांमध्ये मराठा जातीतील [क्षत्रिय] शेतक-यांचे वर्चस्व आहे. कारण एकूण शेतक-यांमधील ६३.७५ टक्के शेतकरी मराठा आहेत. तर लिंगायत जातीतील [कोष्टी, वाणी, तेली] ७.५० टक्के शेतकरी आहेत.

## ४.३ शिक्षण :

कृषि विकासात्मक पाऊले टाकण्यासाठी शेतकरी हा शिक्षित असावा लागतो, तरच शेतीत वैज्ञानिक व भौतिकवादी विचारांचा फायदेशीर पगडा बसेल. यामुळे निवडलेल्या अभ्यास गावातून शेतक-यांची शैक्षणिक स्थिती पाहणे आवश्यक आहे. एकूण शेतक-यापैकी १८.७५ टक्के शेतकरी निरक्षर आहेत. प्राथमिक शिक्षित शेतकरी ४० टक्के आहेत, माध्यमिक शिक्षित २८.७५ टक्के आहेत तर उच्च शिक्षित १२.५ टक्के शेतकरी आहेत. एकूण शेतक-यांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतलेल्या शेतक-यांची संख्या [६८.७५ टक्के] सर्वात जास्त आहे व उच्च शिक्षित व्यक्तीही शेतीकडे वळलेल्या दिसतात.

## ४.४ व्यवसाय :

अभ्यासाखालील ऐंशी शेतक-यांची त्यांच्या प्रमुख व्यवसायानुसार विभागणी शेती, मजुरी, इतर व्यवसाय अशी केली. हे शेतकरी प्रमुख व्यवसायाबरोबरच शेती करीत असल्यामुळे त्यांचा संबंध कृषि बाजाराशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या संबंध येतो. इतर व्यवसायामध्ये नोकरी, व्यापार, हॉटेल चालक, चर्मकार, सायकल दुकान चालक आहेत. मशागत व्यवसाय प्रमुख असणा-या कृषकांची संख्या ६२ [७७.५ टक्के] आहे. तीन [३.७५ टक्के] शेतकरी मजुरीही करतात. पंधरा [१८.७५ टक्के] शेतकरी इतर व्यवसाय करताना दिसतात. अभ्यास गावापैकी माळवणी व करकंब गावातील सर्व शेतकरी फक्त शेती करतात. सर्वेक्षणामध्ये एकही शेतकरी हस्त व्यवसाय करणारा आढळला नाही.

## ४.५ शेतकरी म्हणून अनुभव काळ :

शेतकरी स्वानुभवावरून शेती मशागत व उत्पादन करतो. शेतक-यांचा शेतीतील अनुभव शेतीतील अनिश्चितता प्रमाण घटवितो. ५ वर्षापर्यंत शेती

बद्दल अनुभव असणारे १२.५२ टक्के, ६ ते १० वर्ष अनुभव असणारे १६.१५ टक्के, ११ ते २० वर्ष अनुभव असणारे २० टक्के तर २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असणारे सर्वात जास्त म्हणजे ३४ टक्के शेतकरी आहेत. कमी अनुभव काळ असणा-या शेतक-यांची संख्या कमी तर जास्त अनुभव काळ असणा-या शेतक-यांची संख्या जास्त आहे.

४.६ कुटुंब आकार :

ग्रामीण भागात एकत्र कुटुंब पध्दती तसेच विभक्त कुटुंब पध्दती आढळून येते. शेतक-यांवर कृषि उत्पादनावर, कुटुंब उपभोगाचा प्रभाव दिसतो. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या कृषि बाजारावर-ही परिणाम आढळतो

एकूण कुटुंबांची संख्या :- एकूण शेतक-यांच्या कुटुंब संख्येपैकी १३.७५ टक्के कुटुंबांची संख्या ३ व्यक्तीपर्यंत होती. ४ ते ६ व्यक्ती असणा-या कुटुंबाची संख्या सर्वात जास्त म्हणजे ४१.२५ टक्के आहे, तर ७ ते ९ व ९ पेक्षा जास्त व्यक्ती असणा-या कुटुंबाची संख्या क्रमशः २५ टक्के, २० टक्के अशी आहे. ४ ते ६ व्यक्ती असणा-या कुटुंबापर्यंत शेतक-यांची संख्या सर्वात जास्त आहे तर नंतरच्या कुटुंब व्यक्ती गटात शेतक-यांची संख्या कमी आहे.

कुटुंब : स्त्री-पुरुष - ३ पर्यंत पुरुष असणा-या कुटुंबाची संख्या सर्वात जास्त आहे व नंतर कुटुंब व्यक्ती गटात कुटुंबांची संख्या कमी आहे. अशीच स्थिती स्त्रीयांच्या बाबतीत दिसते. ३ पर्यंत व्यक्ती असणा-या कुटुंबामध्ये एका पुरुषामागे १.५ स्त्रीया दिसतात तर नंतरच्या कुटुंब व्यक्ती गटात स्त्री संख्येपेक्षा पुरुष संख्या जास्त आहे.

४.७ वार्षिक उत्पन्न :-

शेतकरी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करताना त्यांच्या शेतीतून मिळणारे उत्पन्न, नोकरी, सेवा व इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न


## तक्ता क्रमांक ४.१

## सर्वेक्षण गावातील शेतक-यांचे उत्पन्न बदल

[१९७७-७८ ते १९८७-८८]

| उत्पन्न [रुपये] | ७७-७८ | ८१-८२ | ८४-८५ | ८५-८६ | ८६-८७ | ८७-८८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १,००० पर्यंत | २३<br>[३१.९४]<br>[२८.७५] | १६<br>[२२.२२]<br>[२०] | ११<br>[१५.२८]<br>[१३.७५] | १०<br>[१३.८९]<br>[१२.५] | ८<br>[११.११]<br>[१०] | ४<br>[५.५६]<br>[५] | ७२<br>[१००]<br>[१५] |
| १,००१ ते ५,००० | ३१<br>[१८.५६]<br>[३८.७५] | ३२<br>[१९.१६]<br>[४०] | ३५<br>[२०.९६]<br>[४३.७५] | २१<br>[१२.५७]<br>[२६.२५] | २३<br>[१३.७७]<br>[२८.७५] | २५<br>[१५.२५]<br>[३१.२५] | १६७<br>[१००]<br>[३४.७९] |
| ५,००१ ते १०,००० | १५<br>[१२.७१]<br>[१८.७५] | १३<br>[११.०२]<br>[१६.२५] | १७<br>[१४.४१]<br>[२१.२५] | २७<br>[२२.८८]<br>[३३.७५] | २३<br>[१९.४९]<br>[२८.७५] | २३<br>[१९.४९]<br>[२८.७५] | ११८<br>[१००]<br>[२४.५८] |
| १०,००१ ते १५,००० | ८<br>[१३.७९]<br>[१०] | १३<br>[२२.४१]<br>[१६.२५] | ११<br>[१८.९७]<br>[१३.७५] | ११<br>[१८.९७]<br>[१३.७५] | १०<br>[१७.२४]<br>[१२.५०] | ५<br>[०८.६२]<br>[०६.२५] | ५८<br>[१००]<br>[१२.०८] |
| १५,००१ ते २०,००० | – | २<br>[०६.६७]<br>[०२.५०] | १<br>[०३.३३]<br>[०१.२५] | ६<br>[२००]<br>[०७.५] | ९<br>[३०]<br>[११.२५] | १२<br>[४०]<br>[१५] | ३०<br>[१००]<br>[०६.२५] |
| २०,००१ ते २५,००० | – | – | १<br>[१०]<br>[०१.२५] | १<br>[१०]<br>[०१.२५] | ३<br>[३०]<br>[०३.७५] | ५<br>[५०]<br>[०६.२५] | १०<br>[१००]<br>[०२.०८] |
| २५,००१ ते ३०,००० | – | – | – | – | १<br>[२५]<br>[०१.२५] | ३<br>[७५]<br>[०३.७५] | ४<br>[१००]<br>[००.८] |
| ३०,००१ पेक्षा जास्त | ३<br>[१४.२९]<br>[०३.७५] | ४<br>[१९.०५]<br>[५] | ४<br>[१९.०५]<br>[५] | ४<br>[१९.०५]<br>[५] | ३<br>[१४.२९]<br>[०३.७५] | ३<br>[१४.२९]<br>[०३.७५] | २१<br>[१००]<br>[०४.३८] |
| एकूण .. | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ८०<br>[१६.६७]<br>[१००] | ४८०<br>[१००]<br>[१००] |

# ४.१ कृषकांच्या उत्पन्न बदलाचा पायचार्ट



आणि शेतीवरील कर्ज वजा जाता राहिलेल्या उत्पन्नाचा विचार केला आहे. शेतक-यांच्या आर्थिक प्रगतीची पाहणी करताना मागील १० वर्षापासूनचे उत्पन्न विचारात घेतले आहे. तक्ता क्र. ४.१ मधील माहितीवरुन असे दिसते की, १९७७-७८ मध्ये १,००० पर्यंत उत्पन्न असणारे २८.७५ टक्के शेतकरी होते त्यामध्ये उत्तरोत्तर घट होऊन या उत्पन्न गटात १९८७-८८ यावर्षी फक्त ५ टक्केच शेतकरी होते. म्हणजे २३.७५ टक्के शेतकरी या उत्पन्न गटातून वरील उत्पन्न गटात गेले. १,००१ ते ५,००० या उत्पन्न गटात १९७७-७८ मध्ये ३८.७५ टक्के शेतकरी होते मात्र यात वाढ होऊन १९८४-८५ वर्षी ४३.७५ टक्के शेतकरी होते. १९८५-८६ यावर्षी या उत्पन्न गटातील शेतक-यांच्या प्रमाणात घट दिसते. यावर्षी फक्त २६.२५ टक्के शेतकरी या उत्पन्न गटात होते. हळूहळू पुन्हा पुढी वर्षी शेतक-यांच्या संख्येत वाढ झाली. १९८५-८६ मध्ये या उत्पन्न गटातील शेतक-यांच्या प्रमाणात एकदम घट झाली व नंतरच्या वर्षात सावकाश वाढ झाली या उत्पन्नगटातील शेतक-यांचे प्रमाण ७.५० टक्क्यांनी घटलेले दिसते. ५,००१ ते १०,००० या उत्पन्न गटात १९७७-७८ साली १८.७५ टक्के शेतकरी होते. १९८१-८२ मध्ये थोडी घट होऊन १६.२५ टक्के शेतकरी या गटात होते. नंतर मात्र या गटातील शेतक-यांच्या संख्येत वाढ होऊन १९८५-८६ साली ३३.७५ टक्के शेतकरी या उत्पन्न गटात होते. यात नंतर घट होऊन १९८६-८७ व १९८७-८८ या दोन वर्षी शेतक-यांची संख्या २८.७५ टक्क्यांवर स्थिरावली. साधारणतः दहा वर्षापूर्वी पेक्षा या गटात १० टक्के शेतक-यांची भर पडली. १०,००१ ते १५,००० या उत्पन्न गटात १९७७-७८ साली १० टक्के शेतकरी होते. १९८१-८२ मध्ये या उत्पन्न गटातील शेतकरी संख्येत वाढ होऊन १६.२५ टक्के झाली. १९८४ ते ८६ या दोन वर्षात शेतक-यांची संख्या घटून १३.७५ टक्क्यांवर स्थिरावली व नंतर उत्तरोत्तर घट होऊन १९८७-८८ मध्ये ६.२५ टक्के शेतकरी या गटात राहिले. १९७७-७८ च्या शेतकरी संख्येपेक्षा १९८७-८८ मध्ये या उत्पन्न गटातील शेतकरी संख्येत ३.७५ टक्क्यांनी घट झालेली दिसते. १५,००१ ते २०,०००

या उत्पन्न गटात १९७७-७८ ला एकही शेतकरी नव्हता. १९८१-८२ ला एकूण शेतक-यांच्या २.५ टक्के शेतकरी होते. १९८४-८५ मध्ये १.२५ टक्का इतकेच शेतकरी उरले. नंतर प्रतीवर्षी शेतक-यांचे प्रमाणे या गटात वाढत जाऊन १९८७-८८ मध्ये १५ टक्के इतके झाले. २०,००१ ते २५,००० या उत्पन्न गटातील १९७७ पासून १९८२ पर्यंत कोणीही शेतकरी नव्हता. तर १९८४-८५ व १९८५-८६ या दोन वर्षी एकूण शेतक-यांपैकी १.२५ टक्का शेतकरी या उत्पन्न गटात होते. या गटात शेतक-यांची संख्या वाढत जाऊन १९८७-८८ मध्ये त्यांचे प्रमाणे ६.२५ टक्के इतके झाले. २५,००१ ते ३०,००० या उत्पन्न गटात १९८६-८७ व १९८७-८८ यावर्षी अनुक्रमे १.२५ टक्के व ३.७५ टक्के शेतकरी होते. ३०,००१ पेक्षा जास्त उत्पन्न असणारे शेतकरी संख्या साधारणतः स्थीर स्वरूपाची दिसते. १९८१-८२ पासून १९८५-८६ पर्यंत ५ टक्के शेतकरी या उत्पन्न गटात होते ते १९८६-८७ व १९८७-८८ मध्ये पूर्ववत स्थितीत (३.७५ टक्के) राहिलेले दिसते.

अभ्यास गावातील शेतक-यांचे उत्पन्न कमी पातळीवरून उच्च पातळीवर सरकले आहे. त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली आहे.

शेतक-यांच्या १९८७-८८ या वर्षाच्या उत्पन्नाचा वय, शिक्षण, व्यवसाय या तिन्हींच्या संदर्भात सापेक्षतः अभ्यास करून त्याचे निष्कर्ष खाली दिले आहे.

४.७.१ <u>वय निहाय उत्पन्न :</u>

२५ वर्षापर्यंत वय असणा-या शेतक-यांचे वार्षिक उत्पन्न १,००१ ते १५,००० असे आहे. तर २६ ते ५५ वय असणारे शेतकरी सर्व उत्पन्न गटात दिसतात. ५६ ते ६५ व ६६ वर्ष वयाच्यावर असणा-या शेतक-यांचे उत्पन्न

हे १,००१ ते २०,००० या उत्पन्न गटात मर्यादित आहे. २६ ते ५५ या वयातील शेतक-यांची आर्थिक स्थिती चांगली आहे.

### ४.७.२ शिक्षण निहाय उत्पन्न :

विविध शैक्षणिक स्थरावर असणा-या एकूण शेतक-यांपैकी जवळ-जवळ ६० टक्के शेतकरी हे १,००१ ते १०,००० या उत्पन्न गटातील आहेत. प्रत्येक उत्पन्न वर्गात सापेक्षत: माध्यमिक शिक्षित शेतक-यांची संख्या जास्त आहे. निरक्षर व प्राथमिक शिक्षितांची उत्पन्न मर्यादा रु. ३०,००० च्या आत आहे. विशेष लक्षात घ्यावयाची बाब अशी की, १,००० पर्यंत उत्पन्न असणारा व ३०,००१ पेक्षा जास्त उत्पन्न असणारा एकही उच्च शिक्षित शेतकरी नाही.

### ४.७.३ व्यवसाय निहाय उत्पन्न :

शेती हा प्रमुख व्यवसाय करणा-या एकूण शेतक-यांचे प्रमाण मजूरी व इतर व्यवसाय करणा-यांच्यापेक्षा सर्व उत्पन्न गटात जास्त आहे. १,००१ ते ५,००० रुपये उत्पन्न गटात मजूरी व इतर प्रमुख व्यवसाय करणा-या शेतक-यांचा क्रमश: १०० टक्के व ४० टक्के असा सहभाग आहे. मात्र शेती हा प्रमुख व्यवसाय असणा-यांचा ५,००१ ते १०,००० या उत्पन्न गटात जास्त [३३.८७ टक्के] सहभाग दिसतो.

### ४.८ शेतक-यांचे धारण क्षेत्र :

प्रत्येक जमीन धारण गटातील शेतक-यांच्या संख्येचा विचार केल्यास १.५० ते २.५० हेक्टर जमीन धारणक्षेत्र असणा-यांची संख्या सर्वात जास्त आहे. तक्ता क्रमांक ४.२ प्रमाणे साडे आठ हेक्टर पेक्षा जास्त बागायत शेती कोणाचीही

## तक्ता क्रमांक ४.२

## सर्वेक्षण गावातील कृषकाचे जमीन धारण क्षेत्र

[ ८

| क्षेत्र वर्ग व हेक्टर आर | बागायत | कोरडवाहू | पडित | गवतपड | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| ०.५० पर्यंत | १४ [१८.४२] | ७ [११.८६] | १८ [४३.९ ] | ६ [ १०० ] | २ [ २.५ ] |
| ०.५१ ते १.५० | २५ [३२.८९] | १३ [२२.०३] | १६ [३९.०२] | - | १३ [१६.२५] |
| १.५१ ते २.५० | २६ [३४.२१] | १५ [२५.४२] | ६ [१४.६३] | - | १५ [१८.७५] |
| २.५१ ते ३.५० | ४ [ ५.२६] | ५ [ ८.४७] | १ [ २.४४] | - | ११ [१३.७५] |
| ३.५१ ते ४.५० | १ [ १.३१] | ७ [११.८६] | - [ | - | ९ [११.२५] |
| ४.५१ ते ५.५० | २ [ २.६३] | ५ [ ८.४७] | - | - | ८ [ १० ] |
| ५.५१ ते ६.५० | ३ [ ३.९५] | ३ [ ५.०८] | - | - | ४ [ ५ ] |
| ६.५१ ते ७.५० | - | १ [ १.६९] | - | - | ५ [ ६.२५] |
| ७.५१ ते ८.५० | १ [ १.३१] | १ [ १.६९] | - | - | ५ [ ६.२५] |
| ९.५१ ते १०.५० | - | १ [ १.६९] | - | - | ३ [ ३.७५] |
| १०.५१ च्या पर | - | १ [ १.६९] | - | - | ५ [ ६.२५] |
| एकूण .... | ७६ [ ९५ ] [ १०० ] | ५९ [ ७३.७५ ] [ १०० ] | ४१ [५१.२५ ] [ १०० ] | ६ [७.५ ] [ १०० ] | ८० [ - ] [ १०० ] |

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नाही. एकूण शेतक-यांपैकी ३० [३७ टक्के] शेतकरी सीमांत शेतकरी आहेत, २० [२५ टक्के] लहान १२ [१५ टक्के] मध्यम तर १८ [२२.५०टक्के] शेतकरी मोठे म्हणून विचारात घेता येतील.

एकूण शेतक-यांपैकी ९५ टक्के शेतकरी [७६] बागायत तर ७३.७५ टक्के शेतकरी [५९] जिरायत शेती करतात एक शेतकरी कोरडवाहू शेती करीत असल्यास १.२९ शेतकरी बागायत शेती करतात. अशात-हेने बागायत क्षेत्र असणारे शेतकरी संख्या जास्त आहे. कोरडवाहू शेती करणारा शेतकरी वर्ग सर्वसाधारण क्षेत्रात विभागला आहे.

जिरायत वा कोरडवाहू क्षेत्रामध्ये पावसाच्या पाण्यावर पिके काढली जातात. त्यामुळे उत्पादनात अनिश्चितता आढळते. धारणाक्षेत्राप्रमाणे २.५० हेक्टर पर्यंत जिरायत जमीन असलेले ३५ [४३.७५ टक्के] आहेत. २.५१ ते ५.५० हेक्टर धारणा क्षेत्रात १७ [२१.२५ टक्के] शेतकरी आहेत.

बागायत व कोरडवाहू जमीनीचा संपूर्ण वापर कृषि उत्पादनाकरीता होत नाही. त्यापैकी काही अंशी जमीन पडीत क्षेत्र व गवतपड क्षेत्र असते. जमीनीच्या तुकड्यामुळे बांध, बंधारे, नाले वा धुरे तयार करावे लागल्यामुळे त्याखाली कित्येक हेक्टर जमीन निरुपयोगी म्हणून पडून राहते. या धु-या बंधा-यांवर निरनिराळ्या प्रकारचे गवत वाढते. ते पिकांना मोठ्याप्रमाणावर उपद्रवी ठरते. पडीत व गवतपड जमीन ही जमिनीच्या, पिकांच्या व निंदन आदि खर्चाच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरत असते. एकूण शेतक-यांपैकी ४१ [५१.२५ टक्के] शेतक-यांची जमीन पडीत आहे तर ६ [७.५ टक्के] शेतक-यांची जमीन गवतपड आहे. जवळ-जवळ निम्म्या शेतक-यांची काही जमीन पडीक आहे.

धारणा क्षेत्राचा वय, जात, शिक्षण, व्यवसाय, कुटुंब आकार या गोष्टींचे सापेक्षत: विवेचन खालीलप्रमाणे मांडता येते.

४.८.१ <u>वय निहाय धारणा क्षेत्र:</u>

वया प्रमाणे जमीनीचे धारणा क्षेत्र वाढत जात असलेले दिसून येते. २५ वर्षे वयापर्यंतच्या शेतक-यांचे धारणा क्षेत्र जास्तीत जास्त साडे पाच हेक्टर

आहे. तर २६ ते ३५ वयोगटातील शेतक-यांच्या बाबतीत ही मर्यादा साडे आठ हेक्टर पर्यंत वाढत गेली आहे. येथून पुढे सर्व वयो गटातील शेतकरी साडे दहा हेक्टरच्या मर्यादेपर्यंत जमीन धारण करतात.

४.८.२ **जात निहाय धारण क्षेत्र :**

माळी, न्हावी, महार, कोळी या जातीतील शेतक-यांकडील धारण क्षेत्र अडीच हेक्टर पेक्षा कमी आहे. मुस्लिम शेतक-यांचे (एक शेतक-यांचा अपवाद सोडता) दिड हेक्टर पेक्षा कमी धारण क्षेत्र आहे. जैन शेतक-यांचे जमीन धारण क्षेत्र साडे  सहा हेक्टर पेक्षा जास्त आहे, तर ब्राम्हण शेतक-यांचे अडीच हेक्टर पेक्षा जास्त आहे. मराठा समाजातील शेतकरी बहुतेक सर्व धारण क्षेत्र गटात आहेत. मुस्लिम धर्मातील शेतक-यांमध्ये धारण क्षेत्रांच्या बाबतीत तीव्र विषमता आहे.

४.८.३ **शिक्षण निहाय धारण क्षेत्र :**

शेतक-यांचे शिक्षण व धारण क्षेत्र यांचा काही संबंध दिसत नाही. साधारणपणे सर्व शिक्षण गटातील शेतकरी सर्व जमीन धारण क्षेत्र गटात आहेत. पण निरक्षर शेतकरी साडे पाच हेक्टर धारण क्षेत्र गटापर्यंत जास्त प्रमाणात (६६.६७ टक्के) आहेत, प्राथमिक शिक्षण घेतलेले शेतकरी साडेपाच हेक्टर धारणाक्षेत्र गटापर्यंत (७५ टक्के) जास्त प्रमाणात, तर माध्यमिक शिक्षण घेतलेले शेतकरी साडे पाच हेक्टर धारणाक्षेत्र गटापर्यंत (६९.५६ टक्के) प्रामुख्याने आहेत. उच्च शिक्षण घेतलेले शेतकरी साडे पाच हेक्टर धारण क्षेत्र गटापर्यंत ८० टक्के इतक्या अधिक्याने आहेत.

४.८.४ **व्यवसाय निहाय धारण क्षेत्र :**

व्यवसायानुसार धारण क्षेत्राचे पृथक्करण केले असता असे दिसते की, साडे आठ ते साडे नऊ हा धारणाक्षेत्र गट वगळता सर्व गटात शेतकरी पसरलेले आहेत. मजूरी करणारे शेतकरी अर्धा हेक्टर ते दीड हेक्टर व साडे सात ते

साडे आठ हेक्टर धारण क्षेत्रात आहेत. शेती व्यवसाय करणा-या मध्ये अर्धा हेक्टर ते साडे तीन हेक्टर धारण क्षेत्र गटात बहुसंख्य [४८.७८ टक्के] शेतकरी आहेत.

४.८.५ <u>कुटुंब आकार निहाय धारण क्षेत्र :</u>

कुटुंबात ४ ते ६ व्यक्ती असणा-या शेतक-यांची जमीन ६.५० हेक्टर पर्यंतच आहे. मात्र उरलेल्या कुटुंब गटातील शेतकरी बहुतेक सर्व जमीन धारण क्षेत्र गटात आहेत.

४.९ <u>पीक प्रकार :</u>

अन्नधान्ये, नगदी, भाजीपाला व फळे असे पीकाचे विभाग केले असून पीक प्रकार कृषि बाजारावर प्रभाव टाकत असल्यामुळे पाहणी गावातील शेतक-यां-मध्ये कोणत्या प्रकारची पीके घेण्याची प्रवृत्ती आहे हे पडताळणे जरुरीचे आहे.

सर्वेक्षणात असलेल्या एकूण शेतक-यापैकी ७८ [९७.५ टक्के] शेतकरी अन्नधान्ये पिकवितात. तर एकूण शेतक-यापैकी ६२ [७७.५० टक्के] शेतकरी नगदी पिके घेतात. ही संख्या समाधानकारक व प्रगतीदायक आहे. भाजीपाला पिकविणारे २२ [२७.५० टक्के] आहे. एकूण शेतक-यापैकी ८ [१० टक्के] शेतकरी फळे पिकवितात. रोपळे, करकंब, भाळवणी, गादेगांव, सरकोली या गावातून फळे पिकविणारे शेतकरी आढळले.

एकूण सर्व पीके घेणा-या शेतक-यापैकी पीक प्रकाराचे एकमेकांशी प्रमाण सामान्यपणे पुढील प्रमाणे आहे. फळे पिकविणा-या ३ शेतक-यांमागे ७ व्यक्ती भाजीपाला काढतात, २१ व्यक्ती नगदी पीक घेतात तर २६ व्यक्ती अन्नधान्य पिकवितात

पीक प्रकाराचा वय, जात, शिक्षण, व्यवसाय, कुटुंब आकार, उत्पन्न, धारण क्षेत्र या संदर्भात सापेक्षत: विचार खालीलप्रमाणे केला आहे.

४.९.१ वय निहाय पीक प्रकार :

अन्नधान्ये पिकविणा-या शेतक-यात ३६ ते ४५ या वयोगटातील शेतकरी आघाडीवर [२९.४८ टक्के] आहेत तर २६ ते ३५ या वयोगटातील शेतकरी त्या पाठोपाठ [२३.०८ टक्के] आहेत. ५६ ते ६५ या गटातील शेतकरी सर्वात कमी [६.४१ टक्के] आहेत. नगदी पीक घेणा-यात सुध्दा ३६ ते ४५ या गटातीलच शेतकरी सर्वात पुढे [३२.२६ टक्के] आहेत व त्या पाठोपाठ २६ ते ३५ व ४६ ते ५५ या वयोगटातील लोक सारख्याच प्रमाणात [प्रत्येकी १९.३५ टक्के] आहेत. भाजीपाला पिकविण्यात २६ ते ३५ व ३६ ते ४५ वयोगटातील तर फळे पिकविण्यात २५ वया पर्यंतच्या गटातील शेतकरी आघाडीवर [२५.८० टक्के] आहेत. पण त्यांच्या बरोबर ६६ वर्षे वयाच्या वरील गटातील शेतकरीही तेवढयाच प्रमाणात [२५ टक्के] आहेत.

सर्वच वयोगटातील शेतक-यांचा धान्योत्पादनाकडे जास्त ओढा आहे.

४.९.२ जाती निहाय पीक प्रकार :

ब्राम्हण, लिंगायत, जैन, चलमार व मुस्लिम शेतकरी इतर पिकांपेक्षा अन्नधान्य पिकविणे पसंत करतात. मराठा समाजातील शेतकरी नगदी पीके घेणे पसंत करतात. माळी, न्हावी, चांभार, महार या समाजातील शेतकरी अन्नधान्य व नगदी ही दोन्ही पीके सारख्याच प्रमाणात पसंत करतात.

४.९.३ शिक्षण निहाय पीक प्रकार :

निरक्षर शेतकरी अन्नधान्य व नगदी पीक जास्त प्रमाणात घेतात. प्राथमिक शिक्षित व माध्यमिक शिक्षित यांच्यात पीके घेताना दिसतात. तर उच्च शिक्षितापैकी फक्त अन्नधान्य व नगदी पीक घेणे पसंत करतात.

अन्नधान्य व नगदी पीक सर्व शैक्षणिक स्तरावरील शेतकरी घेतो.

४.९.४ व्यवसाय निहाय पीक प्रकार :

शेती हा प्रमुख व्यवसाय असलेले शेतकरी विविध पीके घेतात, पण अन्नधान्य [४४.२७ टक्के] व नगदी [३५.११७ टक्के] पीके घेणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. मजूर शेतकरी [६० टक्के] अन्नधान्याचे पीक जास्त प्रमाणात आणि नगदी व भाजीपाला ही पीके सारख्या प्रमाणात घेतात. इतर व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यां मध्ये पीक प्रकारात विविधता दिसते.

४.९.५ कुटुंब आकारानुसार पीक प्रकार :

सर्व आकराच्या कुटुंब गटात अन्नधान्य, नगदी पीके, भाजीपाला व फळे असा पिकांचा अग्रक्रम आहे.

४.९.६ उत्पन्न निहाय पीक प्रकार :

सर्व उत्पन्न वर्गातील सर्व शेतकरी नगदी व अन्नधान्य पिक घेतात. १,००१ ते १५,००० उत्पन्नातील सर्व शेतकरी सर्व प्रकारची पीक घेतात. तर १,००१ ते २५,००० उत्पन्न गटातील शेतकरी फळापेक्षा भाजीपालाच घेताना दिसतात.

४.९.७ धारण क्षेत्र निहाय पीक प्रकार :

सर्व धारणाक्षेत्र गटातून नगदी व अन्नधान्य पीक घेतले जाते. अर्धा हेक्टरच्यावर धारण क्षेत्र असलेले शेतकरी भाजीपाला घेतात. तर अडीच हेक्टरच्या पुढील धारण क्षेत्रातून फळे घेतली जातात. २.५१ ते ५.५० हेक्टर हे धारणक्षेत्र सर्व पीक प्रकारास अनुकूल आहे. वाढत्या धारण क्षेत्राबरोबर अन्नधान्य अथवा नगदी पीके घेण्याकडे शेतकऱ्याचा ओढा असल्याचे दिसत नाही.

४.१० जमीन खरेदी व विक्री व्यवहार :

एकूण अभ्यास गावापैकी तुंगत, रोपळे, गादेगाव, करकंब, भाळवणी, मंडीशेगांव या गावातून मागील दहा वर्षांच्या कालावधीत जमीनीची खरेदी केली गेली. एकूण खरेदी केलेले धारणाक्षेत्र १७.९ हेक्टर आहे. त्यासाठी १०,७३,४०० रुपये इतकी किंमत शेतक-यास मोजावी लागली. एकूण जमिनीपैकी ६.५ हेक्टर जमीन बागायत असून ७.४ हेक्टर जमीन जिराईत आहे. एकूण जमीन खरेदीसाठी ८ शेतक-यांनी स्वत: जवळचे, २ शेतक-यांनी नातेवाईकांकडून तर ४ शेतक-यांनी व्यापारी बँकेकडून कर्ज घेऊन ९ जमिनीचे खरेदी व्यवहार पार पाडले. एकूण जमिनीचा विचार करता १ हेक्टर बागायत शेतीची किंमत १५,८९५ रुपये होती तर जिरायत १ हेक्टर जमिनीची किंमत ५,४३२ रुपये इतकी होती.

तुंगत, सिध्देवाडी, करकंब, तरकोली, भाळवणी, मंडीशेगांव या गावातून शेतीचे एकूण ७ विक्री व्यवहार झाले. कौटुंबिक कार्यासाठी व देणी चुकती करण्यासाठी हे व्यवहार झाले. विकलेल्या एकूण जमिनीचे क्षेत्र ११.४२ हेक्टर होते. त्याची किंमत ३,९८,५०० रुपये इतकी मिळाली. साधारणत: प्रती हेक्टरला शेतक-यास २६,१३८ रुपये इतकी रक्कम मिळाली.

४.११ कर्ज पुरवठयाचे मार्ग :

कर्जाची तहान शेतक-यास शेती कार्यासाठी व कौटुंबिक कार्यासाठी लागते. त्यासाठी सहकारी पत संस्था, व्यापारी बँका, याशिवाय सावकार, व्यापारी, मित्र, नातेवाईक इ. मार्ग शेतक-यास अद्याप खुले आहेत.

एकूण अभ्यास गावातील सैंशी शेतक-यापैकी २८ [३५ टक्के] शेतकरी कर्ज घेत नाहीत तर शेतकरी कर्जबाजारी आहेत. सहकारी

पतसंस्थेकडून ३५ [४३.७५ टक्के], कमिशन एजंट कडून १४ [१७.५ टक्के] शेतकरी कर्ज घेतात. व्यापारी बँकेकडून ७ [८.७५ टक्के] शेतकरी आणि ४ [५.०० टक्के] शेतकरी हे खाजगी सावकाराकडून कर्ज घेताना दिसतात.

कर्ज मार्गांचा अभ्यास वय, शिक्षण, व्यवसाय, शेतकरी म्हणून अनुभव काळ, उत्पन्न, धारण क्षेत्र, पीक प्रकार यानुसार सापेक्षत: पुढील प्रमाणे केलेला आहे.

४.११.१ <u>वय निहाय कर्ज मार्ग :</u>

कर्ज घेण्याची प्रवृत्ती २५ वर्षा वयापर्यंतच्या शेतकऱ्यात कमी दिसते. २५ ते ३५ वर्षा पासून सर्व वयोगटातील शेतकरी सहकारी संस्था कडून कर्ज घेणे पसंत करतात. त्या खालोखाल कमिशन एजंट्स, व्यापारी बँका व खाजगी सावकार अशी पसंतीची क्रमवारी आहे. ६५ वर्षे वयावरील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा बराच कमी आहे.

४.११.२ <u>शिक्षण निहाय कर्ज मार्ग :</u>

सर्व शैक्षणिक स्तरातील शेतकरी हे सहकारी संस्था व कमिशन एजंट कडून कर्ज घेतात. प्राथमिक व माध्यमिक शिक्षित शेतकरी सर्व मार्गांनी कर्जे घेतात. तर उच्च शिक्षित शेतकरी व्यापारी बँकेकडून कर्ज घेताना आढळत नाहीत. शिक्षणाच्या उच्च पायरीबरोबर कर्ज घेण्याच्या प्रवृत्तीत वाढ दिसते.

४.११.३ <u>व्यवसाय निहाय कर्ज मार्ग :</u>

शेती हा प्रमुख व्यवसाय असणाऱ्या शेतकऱ्यात कर्जबाजारीपणाचे प्रमाण जास्त आहे व ते सर्व कर्ज मार्गांचा अवलंब करतात. मजूरी व इतर व्यवसाय करणारे शेतकरी सहकारी संस्था व व्यापाऱ्यांवर अवलंबून असलेले दिसतात.

### ४.११.४ अनुभव काळ निहाय कर्ज मार्ग :

१० वर्षा पर्यंत अनुभव असणारे शेतकरी व्यापारी बँकेकडे जाताना दिसत नाहीत. इतर सर्व अनुभव काळ गटातील सर्व शेतकरी कर्जाच्या सर्व स्त्रोत्रांचा अवलंब करताना दिसतात. कर्ज न घेणा-या शेतक-यांपैकी ३५.७१ टक्के शेतकरी २० वर्षापेक्षा जास्त अनुभव काळ असणारे आहेत.

### ४.११.५ उत्पन्न निहाय कर्ज मार्ग :

सर्व उत्पन्न गटातील शेतकरी सहकारी संस्थेकडे कर्जासाठी जातात. १०,००० पर्यंत उत्पन्न असणारे शेतकरी व्यापारी बँक व खाजगी सावकारांकडे जात नाहीत. १,००० रुपयापर्यंत व १,००१ ते ५,००० व १०,००१ ते २५,००० व ३०,००१ वरील उत्पन्न गटातील एकही शेतकरी खाजगी सावकाराकडे जात नाही. ५,००१ ते १०,००० या उत्पन्न गटातील सर्व शेतकरी सर्व कर्ज मार्गांचा अवलंब करतात. एकूण उसनवट नसणा-या शेतक-यांपैकी २८.५७ टक्के शेतकरी हे ५,००१ ते १०,००० या उत्पन्न गटातील आहेत.

### ४.११.६ धारण क्षेत्र निहाय कर्ज मार्ग :

साधारणतः सर्व धारणाक्षेत्र गटातून शेतकरी सहकारी संस्था व कमिशन एजंट यांच्याकडून कर्ज घेताना दिसतात. तर व्यापारी बँक व खाजगी सावकारांकडे काही धारण क्षेत्र गटातील शेतकरी कर्ज घेतात. धारण क्षेत्र वाढीबरोबर कर्ज घेणा-यांचे प्रमाण वाढताना अथवा कमी होताना दिसत नाही.

### ४.११.७ पीक प्रकार निहाय कर्ज मार्ग :

फळे पिकविणारे शेतकरी वगळता बाकी सर्व शेतकरी सर्व मार्गांनी कर्ज घेतात. फळे पिकविणारे शेतकरी फक्त सहकारी संस्था व व्यापारी बँकाकडून कर्ज घेतात व त्यात कर्ज घेणा-यांचे प्रमाण सर्व शेतक-यात कमी आहे.

## ४.१२ बाजार आवार स्थापन्यामागील उद्देश :

या प्रकरणाच्या अखेरीस शेतकऱ्यांचा सर्वदृष्टीने सहभाग पाहण्यासाठी शेतकऱ्यांच्या मते मार्केट यार्ड स्थापन्यामागील हेतू पाहणे महत्वाचे वाटते. मार्केट यार्ड शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झाले आहे. यावरच बाजाराची स्थापन्यामागील हेतू अवलंबून आहे.

शेतमालाचे व्यवस्थित वितरण करण्यासाठी व चांगल्या स्थितीत शेतकऱ्यांना संरक्षण सोई पुरविण्यासाठी कृषि उत्पन्न बाजाराची स्थापना करण्यात आली आहे. असे एकूण ८० शेतकऱ्यांपैकी ६१ [७६.२५ टक्के] शेतकऱ्यांनी सांगितले. तर १४ [१७.५ टक्के] शेतकऱ्यांनी कृषि बाजाराची स्थापना व्यापाऱ्यांच्या हितासाठी झाली असे स्पष्ट सांगितले. मात्र ५ [६.२५ टक्के] शेतकऱ्यांनी काहीही मत प्रदर्शित करण्यास नकार दिला.

बहुतांशी शेतकरी मार्केट यार्ड स्थापन करण्यामागील हेतू स्पष्टपणे व बरोबर सांगू शकले पण बाकीच्या शेतकऱ्यांना या हेतूची कल्पना देणे जरुरीचे आहे.

*****